TATA POWER

# दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड

बॉंबे हाउस, २४, होमी मोदी स्ट्रीट, मुंबई- ४०० ००१

सीआयएन क्र. : एल२८९२०एमएच१९१९पीएलसी०००५६७ वेबसाइट : www.tatapower.com

TATA

## सार्वजनिक सूचना

**ईएचव्ही ग्राहकांसाठी १८ मार्च २०१९ रोजीच्या एटीई आदेशानुसार व्हीलिंग शुल्क निश्चितीसाठी टाटा पॉवर वितरण व्यवसायाच्या (टाटा पॉवर-डी) याचिकेबाबत आक्षेप/ सूचना (खटला क्रमांक २०१९चा ९५)**

१.विद्युत अपील अधिकरणाने (एटीई) आपल्या १८ मार्च २०१९ रोजीच्या अपील क्रमांक २०१८ चे ८४ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियाम आयोगाला एक्स्ट्रा हाय व्होल्टेज (ईएचव्ही) पातळीवर जोडलेल्या ग्राहकांसाठी व्हीलिंग शुल्क निश्चितीचे निर्देश दिले आहेत.

२.त्यानुसार दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेडच्या वितरण व्यवसायाने (टाटा पॉवर-डी) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगासमोर (एमईआरसी) ईएचव्ही ग्राहकांसाठी व्हीलिंग शुल्कनिश्चितीसाठी खटला क्रमांक २०१९चा ९५ दाखल केला आहे. आयोगाने सदर याचिका ९ मे २०१९ रोजी दाखल करून घेतली आहे आणि टाटा पॉवर-डीला कायद्याच्या कलम ६४ (२) अंतर्गत सार्वजनिक सूचना प्रकाशित करण्याचे निर्देश दिले आहेत.

३.टाटा पॉवर-डीने आपल्या याचिकेत व्हीलिंग शुल्क निश्चितीसाठी खालील पद्धत प्रस्तावित केली आहे:

**प्रस्तावित पद्धत**

खटला क्रमांक २०१८ चा ६९ च्या एमटीआर आदेशात व्हीलिंग शुल्क ईचव्ही ग्राहक पारेषणाला जोडलेले आहेत हे समजून ईएचव्ही विक्री वगळून व्हीलिंग शुल्क निश्चित करण्यात आले होते. अपील क्रमांक २०१८ चे ८४ मध्ये एटीई निवाड्यानुसार ईएचव्ही ग्राहक टाटा पॉवर डीच्या वितरण यंत्रणेला जोडले जाऊ शकतात आणि जोडलेले आहेत हे सिद्ध झाले आहे आणि त्यानुसार ईएचव्ही ग्राहकांना व्हीलिंग शुल्क लागू आहेत. या निवाड्यावर आधारित राहून, २१ ऑक्टोबर २०१६ रोजीच्या एमवायटी आदेशातील तत्वांचा स्विकार करून आणि ईएचव्ही विक्री समाविष्ट करून व्हीलिंग शुल्क निश्चित करण्यात आले आहे. विद्यमान व्हीलिंग शुल्क आणि प्रस्तावित व्हीलिंग शुल्क खालील तक्त्यात दर्शवल्याप्रमाणे आहे:

**तक्ता : प्रस्तावित व्हीलिंग शुल्क**

| अनु क्र. | कालावधी | लागू दर आदेश | व्होल्टेज पातळी | लागू असलेले व्हीलिंग शुल्क (रूपये/ केडब्ल्यूएच) | प्रस्तावित व्हीलिंग शुल्क (रूपये/ केडब्ल्यूएच) | लागू योग्यता |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सप्टेंबर २०१८ ते मार्च २०१९* | खटला क्र. २०१८ चा ६९ (एमटीआर आदेश) | इएचव्ही | ० | १.४६ | सर्व ईएचव्ही ग्राहकांना |
| २ | एप्रिल २०१९ ते मार्च २०२० | खटला क्र. २०१८ चा ६९ (एमटीआर आदेश) | इएचव्ही | ० | १.३७ | सर्व ईएचव्ही ग्राहकांना |
| | | | एचटी | १.६९ | १.३७ | सर्व एचटी ग्राहकांना |
| | | | एलटी | २.९७ | २.६४ | सर्व एलटी ग्राहकांना |

***एचटी आणि एलटी व्हीलिंग शुल्कात बदल नाही**

नोंद: माननीय आयोगाने मार्च २०१८ ते ऑगस्ट २०१८ या कालावधीसाठी २०१६ चा ४७ या खटल्यात ईएचव्ही ग्राहकांसाठी व्हीलिंग शुल्क निश्चित केले आहे. ज्या ईएचव्ही ग्राहकांनी ते भरलेले नाही त्यांनी ते भरावे.

**तसेच माननीय आयोगाने विचारलेल्या डेटा गॅप्सच्या प्रतिसादासंदर्भात टाटा पॉवर-डीने आर्थिक वर्ष २०१९-२० साठी व्हीलिंग शुल्क गणन सादर केले आहे, ते पुढीलप्रमाणे.**

**तक्ता : डेटा गॅप रिस्पॉन्स**

| अनु क्र. | पातळी | चाकांची विक्री (एमयू) | एकूण चाकांच्या विक्रीची टक्केवारी | एचटी व एलटी दरम्यानच्या एकूण चाकांच्या विक्रीची टक्केवारी | जीएफए प्रमाणाची टक्केवारी | वेगळे व्हीलिंग शुल्क (जीएफए टक्केवारीनुसार) (कोटी रूपयांमध्ये) | ईएचव्हीसाठी निर्धारित करण्यात आलेले व्हीलिंग शुल्क (कोटी रूपयांमध्ये) | एचटीसाठी निर्धारित करण्यात आलेले व्हीलिंग शुल्क (कोटी रूपयांमध्ये) | एलटीसाठी निर्धारित करण्यात आलेले व्हीलिंग शुल्क (कोटी रूपयांमध्ये) | निर्धारित करण्यात आलेले एकूण व्हीलिंग शुल्क (कोटी रूपयांमध्ये) | (रूपये/किलोवॅट) नुसार निर्धारित करण्यात आलेले व्हीलिंग शुल्क |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ईएचव्ही (११० केव्ही) | ७०२ | १९% | | १% | ४ | ४ | | | ४ | ०.०६ |
| २ | एचटी | १७६७ | ४९% | ६०% | ७६% | ४९३ | | २९७ | | २९७ | १.६८ |
| ३ | एलटी | ११६५ | ३२% | ४०% | २३% | १४८ | | १९६ | १४८ | ३४४ | २.९५ |
| | | ३६३५ | १००% | १००% | १००% | ६४५ | ४ | ४९३ | १४८ | ६४५ | १.७८ |

नोंद: हे गणन एमवायटी ऑर्डरमध्ये असलेल्या नियमांपेक्षा वेगळे आहे.

४.खालील दस्तऐवजांच्या प्रती टाटा पॉवर-डीच्या खाली निर्देशित केलेल्या कार्यालयांमधून लेखी विनंतीवर प्राप्त केल्या जाऊ शकतात:

**अ**.तपशीलवार याचिका दस्तऐवज सीडीसह (इंग्लिशमध्ये) (रोख/ डीडी/ धनादेश **''टाटा पॉवर कंपनी लिमिटेड''**च्या नावे १५० रूपये प्रदान करून)

**ब**. तपशीलवार याचिका दस्तऐवज (इंग्लिशमध्ये) (१००/- रूपये प्रदान करून)

**क**. तपशीलवार याचिका दस्तऐवज सीडी (इंग्लिशमध्ये) (५०/- रूपये प्रदान करून)

| कार्यालय | पत्ता | दूरध्वनी |
|---|---|---|
| फोर्ट कार्यालय | श्री. ताकवले शशांक, टाटा पॉवर कंपनी लिमिटेड, बॉम्बे हाऊस, २४, होमी मोदी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई- ४००००१ | टेलि: +९१ २२ ६६६५ ७५२९ |
| मुख्यालय | श्री. आर एम रानडे, दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड, 'ए' ब्लॉक, चौथा मजला, कर्नाक रिसिव्हिंग स्टेशन, ३४ संत तुकाराम रोड, कर्नाक बंदर, मुंबई- ४००००९ | टेलि: (९१ २२) ६७१७ १८४६ |
| धारावी | श्रीमती अनालिता, दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड, शालीमार इंडस्ट्रियल इस्टेटजवळ, माटुंगा (पश्चिम) मुंबई- ४०००१९ | टेलि: (९१ २२) ६७१७ २५०१ |
| बोरिवली | श्री. निलेश केकणे, टाटा पॉवर कंपनी लिमिटेड, बोरिवली रिसिव्हिंग स्टेशन, टाटा पॉवर हाउस रोड, बोरिवली पूर्व, मुंबई- ४०००६६ | टेलि: (९१ २२) ६७१७ ३५२४ |

५.आयोगाने टाटा पॉवर डीला उक्तनिर्देशित याचिकेवर सदर सूचनेद्वारे जनतेकडून आक्षेप/ सूचना मागवण्याचे निर्देश दिले आहेत. आक्षेप/ सूचना सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३वा मजला, सेंटर क्रमांक १, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई- ४००००५ (फॅक्स- २२१६३९७६) इमेल- merc@merc.gov.in येथे **३ जून २०१९** पर्यंत सेवेच्या पुराव्यासह श्री. पियूष टंडन, दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड, ब्लॉक ए, चौथा मजला, कर्नाक रिसिव्हिंग स्टेशन, ३४ संत तुकाराम मार्ग, कर्नाक बंदर, मुंबई ४००००९ (इमेल: peyush.tandon@tatapower.com दूरध्वनी: (९१२२) ६७१७१८४५ यांच्या नावे पाठवता येतील.

६.आक्षेप/ सूचना पाठवू इच्छिणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने त्या इंग्लिश किंवा मराठीत सहा प्रतींमध्ये पाठवाव्यात आणि त्यावर पाठवणाऱ्याचे पूर्ण नाव, टपाली पत्ता आणि इमेल पत्ता असल्यास नमूद करण्यात यावा. आक्षेप/ सूचना एखाद्या ग्राहकांच्या वर्गवारीच्या संघटनेकडून सादर करण्यात आले आहेत का हे नमूद करण्यात यावे. पाठवणाऱ्याला वैयक्तिक सुनावणी हवी आहे का हेही नमूद करण्यात यावे, जेणेकरून आयोगाकडून १० जून २०१९ रोजी १० वाजता महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३वा मजला, सेंटर क्रमांक १, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई- ४००००५ येथे आयोजित केलेल्या सार्वजनिक सुनावणीत सुनावणीची संधी देण्यात येईल आणि त्यासाठी स्वतंत्र सूचना देण्यात येणार नाही.

७.टाटा पॉवर-डी प्रत्येक आक्षेप/ सूचनेला ती प्राप्त झाल्यावर तीन दिवसांत परंतु ३ जून २०१९ पर्यंत आलेल्या सर्व आक्षेप/ सूचनांसाठी ६ जून २०१९ पेक्षा उशिरा नाही अशा पद्धतीने प्रतिसाद देईल. समभागधारक टीपीसी-डीने दिलेल्या प्रतिक्रियांवर जोडपत्रे सार्वजनिक सुनावणीच्या वेळी किंवा १३ जून २०१९ पर्यंत सादर करू शकतील.

८.तपशीलवार याचिका दस्तऐवज टाटा पॉवर कंपनीच्या www.tatapower.com वर आणि आयोगाची वेबसाइट www.merc.gov.in येथे डाऊनलोडसाठी (विनामूल्य) उपलब्ध आहे.

सही
नाव (पियुष टंडन)
पद: प्रमुख - नियामक
दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड

स्थान: मुंबई
दिनांक: ११ मे २०१९